divyamarathi.com

दिव्य मराठी विशेष

प्रस्तावाला रेल्वे बोर्डाची मान्यता, खासदार आनंदराव अडसूळ यांची माहिती

# 'काचीगुडा' धावणार नरखेडपर्यंत

प्रतिनिधी | अमरावती

काचीगुडा -अकोला इंटरसिटी एक्स्प्रेस आता अमरावती मार्गे नरखेडपर्यंत धावणार आहे. या प्रस्तावाला रेल्वे बोर्डाने मान्यता दिली असून काही दिवसांमध्येच ही एक्सप्रेस काचीगुडा ते नरखेड अशी धावणार असल्याची माहिती खासदार आनंदराव अडसूळ यांनी दिली.

अमरावतीकर जनतेला अकोल्याकडे सकाळी जाणाऱ्या गाड्यांची कमतरता असल्याने प्रवाश्यांचे अतोनात हाल होतात. या इंटरसिटी एक्स्प्रेसमुळे अमरावतीकर जनतेकरिता यासोबतच वाशिम, हिंगोली, नांदेड आणि हैद्राबाद करिता दररोज जाण्या-येण्याची सुविधा मिळणार आहे. अमरावतीकर जनतेच्या हालअपेष्टा बघून ही गाडी अमरावती मार्गे सुरू करण्याकरिता खासदार अडसूळ यांनी प्रस्ताव पाठविला होता. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या या मागणीची पूर्तता रक्षा बंधनाला खासदार अडसूळ यांनी अनोखी भेट दिली आहे. अमरावती येथील अप-डाऊन प्रवासी मंच याकरिता बऱ्याच वर्षांपासून प्रयत्नरत होता. या गाडीच्या नरखेड पर्यंत वाढविण्याच्या घोषणेनंतर खासदार आनंदराव अडसूळ यांचे अमरावती शहरात प्रथम आगमनाप्रसंगी प्रवासी मंचच्या वतीने स्वागत करण्यात आले. यावेळी मंचचे अध्यक्ष सुभाष




बाळे, राजा इंगोले, प्रा. विजय मोहोड, विष्णुपंत कांबे, मनोहर रहाटे, रमेश उमेकर, सुषमा लांजेवार, नीलेश देशमुख, विशाल दात्रक, नागेश काळे, नितीन नांदूरकर, योगेश फुके, अरविंद लोखंडे, जीवन काळे व अन्य उपस्थित होते. यावेळी स्टेशन प्रबंधक उपस्थित होते. संचालन विजय भारती यांनी केले, तर सतीश प्रेमलवार यांनी आभार मानले.